ISSN : 2349-638X
Impact Factor : 6.293

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि एकविसावे शतक

: संपादक :

डॉ. लहू वाघमारे




SPECIAL ISSUE No. 75, Vol. I
SPECIAL ISSUE PUBLISHED BY
AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Peer Review & Indexed Journal ISSN 2349-638X Impact factor 6.293
E-mail ID : aiirjpramod@gmail.com
www.aiirjournal.com
Mob. 8999250451

Impact Factor - 6.293

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

## Special Issue No.75

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि एकविसावे शतक

**Editor**

Dr. Lahu Waghmare

**Executive Editor**

Dr. Anil Singare

Dr. Arvind Kadam

**Co- Editor**

Dr. Omshiva Ligade

Prof. Amol Pagar

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

| Sr.No. | Name Of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 56 | डॉ. विलास तावरे | अर्थतज्ञ डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर | 237 |
| 57 | वैशाली चनबस बेटकर | ' मारेकरी जेव्हा मातीला येतात ' या कवितासंग्रहातील आंबेडकरवादी विचार | 240 |
| 58 | प्रा. वसंत निवृत्ती बंडे | दलित्तोधारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 246 |
| 59 | डॉ. सुरेश विठ्ठलराव पाथरकर | 21 वे शतक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व कार्य | 249 |
| 60 | डॉ. यशवंत बाबुराव चव्हाण | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अर्थशास्त्रविषयक विचार | 252 |
| 61 | प्रा. डॉ. डी. बी. कोनाळे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय विचार व कार्य | 256 |
| 62 | प्रा. डॉ. दिलीप रामचंद्रराव जाधव | एकविसावे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे समाजसुधारणा विषयक विचार व कार्य | 260 |
| 63 | डॉ. सौ. मेधा देशपांडे | 21 वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार आणि कार्य | 264 |
| 64 | प्रा. अंतेश्वर चंद्रकांत गायकवाड | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता आणि 21वे शतक | 269 |
| 65 | डॉ. राजेंद्रकुमार लक्ष्मणराव लोणे | भीमगीते मराठी कवितेतील समृध्ददालन : शोध आणि चिकित्सा | 276 |
| 66 | डॉ.विद्यादेवी मनोहर कांबळे | दलित साहित्याचे प्रेरणास्रोत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 281 |
| 67 | प्रा. अंकुश रणजित जाधव | 21 वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय विचार | 285 |
| 68 | सौ.विश्रांती सुरेश चांगन | एकविसावे शतक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्थशास्त्रीय विचार व कार्य | 288 |
| 69 | डॉ. नरसिंग आप्पासाहेब कदम | एकविसावे शतक आणि भारतीय संविधान | 291 |
| 70 | डॉ. अशोक गौरीशंकर माळगे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकारितेतील योगदान | 294 |
| 71 | प्रा.एस.एन. पाटील | २१ वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री सुधारणा विषयक विचार व कार्य | 297 |
| 72 | डॉ.पद्माकर पिटले | इतिहासकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर ( रामायण आणि महाभारत या संदर्भात ) | 321 |
| 73 | प्रा. वैजनाथ सुरनर | २१ वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य | 303 |

# दलित साहित्याचे प्रेरणास्रोत : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**डॉ.विद्यादेवी मनोहर कांबळे**
भाषा विभाग प्रमुख
गोविंदराव कन्हैयालाल जोशी(रात्रीचे) वाणिज्य महाविद्यालय, लातूर.

"जग बदल घालूनि घाव
सांगुनी गेले मज भीमराव"

विश्वभुषण , विश्वरत्न, प्रज्ञासूर्य ,प्रकाड पंडित, स्त्री उद्धारक, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार ,समाजसुधारक, क्रांतीपर्व, युगपुरुष, अर्थतज्ज्ञ, धर्मचिकित्सक, कायदेपंडित, शोषित, पीडित, अन्यायग्रस्त आणि मागासलेल्या संपूर्ण मानव समूहाचे उद्धारकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजाला नवी दिशा ,नवा मार्ग, नवी वाट आणि जगणं शिकवलं. सर्वसामान्य ,अस्पृश्य शूद्र समजल्या जाणाऱ्या माणसात जन्माला येऊन सर्व समाजातील स्तराला माणूस म्हणून जगण्याचा मार्ग दाखविला अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म वडील रामजी ,आई भिमाई यांच्या पोटी 14 एप्रिल 891 रोजी इंदूर येथे महु येथे झाला. भीमराव रामजी आंबेडकर यांचा शैक्षणिक प्रवास अतिशय बिकट आणि समाजाने लावून दिलेल्या सर्व बंधनांना सामोरे जात त्यातून एक वेगळी शिकवण घेऊन समाज संघटन करण्यासाठीचा विडा उचलला. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा ' ही जाणीव समाजात उभी केली .

मी ,माझं अस्तित्व या धर्मांध जातिव्यवस्थेने पिडलेल्या समाजात आहे ,मी एक व्यक्ती आहे .असा व्यक्ती जो या.. या समाजाचा एक हिस्सा आहे आणि माझं मला स्वतंत्र विचारसरणी आहे याची जाणीव प्रथम करून दिली .समाजात स्वतंत्र विचारांची पेरणी केली. जिथे वैचारिकतेचा आभाव होता त्या समाजात विचाराची बीज टाकण्यास ,लावण्यास सुरुवात डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी केली .दापोली येथे प्राथमिक शिक्षण ,सातारा येथून शिक्षणाला प्रारंभ आणि मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर एलफिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला त्यादरम्यान रमाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. बी.ए. उत्तीर्ण झाल्यानंतर 12 फेब्रुवारी 1913 रोजी सुभेदार रामजी यांचे निधन झाले त्यानंतर बडोदा येथे नोकरीची सुरुवात झाली. शिक्षणात आलेले अनेक अडचणी आलेले अनुभव त्या अनुभवाचं बोचणं, सलणं,हृदयाला हेलावून टाकणाऱ्या समाजातील धर्म जाती अस्पृश्यता या सर्वांना एकत्रित करून समाजातील अशी जातीव्यवस्थेची दाहकता नसणारी न पेलणारी होती. वर्तमानातील समाज बांधव आणि भविष्याची उभारणीत यातच 'मूकनायक 'ची निर्मिती केली आणि समाज प्रबोधन करण्यास सुरुवात केली .

ब्रिटिशांविरुद्ध चा स्वातंत्र्याचा लढा आणि समाजाचा अंतर्गत असलेल्या दुफळीचा लढा यात आधी समाजाची उभारणे आवश्यक आहेत घराघरातून एक मोठा 'मूकनायक' निर्माण होणे आवश्यक आहे ही जाणीव सतत मनाला मनाला सलत होती आणि त्यातच माझ्या माणसांची ही हेळसांड थांबलीच पाहिजे हा विचार पुढे घेऊन दलित समजल्या जाणाऱ्या सर्वांना एकत्रित आणलं स्त्री पुरुष यांच्या मनातील वेदना, नकार यांना

विद्रोहाची दिशा प्राप्त करून दिली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार यासाठी प्रेरणादायी ठरून त्यातून दलित चळवळ उभी केली.

दलित चळवळीतून दलित वर्गातील सामान्य माणूस शिकला,संघटित झाला आणि संघर्ष करू लागला आपल्या मनातील विचार स्पष्टपणे मांडणे आणि स्पृश्य समाजातील अशा वैचारिकतेला की जी समाजात दुफळी निर्माण करते त्याला धडा शिकवण्यासाठी मौखिक स्वरूपातच नव्हे तर लिखित स्वरूपातही मोठ्याप्रमाणात सजगता येऊन क्रांती करण्यास समाजातील घटक पेटून उठला.दलित साहित्याची निर्मिती ही याच ज्वालामुखी विचारातून झालेली आहे आणि दलित साहित्य मराठी साहित्याला समृद्ध करणारे साहित्य म्हणून मोठ्या प्रमाणात पुढे आले.समाजातील प्रत्येक विषयावर यासाहित्याने अनेक वांग्मय प्रकारातून कडाडून हल्ला केला आणि वाचा फोडण्याचे अद्वितीय कार्य केले.ज्याची मुख्य प्रेरणा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आहेत .

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या आपल्यासारख्याच माणसाला आपल्यासारख्याच माणसाला मीच त्याची वागणूक देणाऱ्या या तुच्छ विचारसरणी असणाऱ्या माणसाचे चित्रण करणारी कथा ,कादंबरी, कविता, नाटक आणि आत्मकथन, आत्मचरित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीने त्यांच्या प्रभावाने भारावलेली आहे जी सामाजिक, राजकीय ,आर्थिक क्रांती करण्यासाठी प्रेरित झाली आहे एका वर्गाशी संघर्ष करण्यासाठी पेटून उठलेली आम्हालाही विचार आहेत, वेदना होतात आणि त्याची जाणीव तुला (समाजातील उच्चभ्रू वर्णाला) झालेली नाही त्या वेदनांना कुठेतरी मांडण्याचा प्रयत्न केला असतास तर आम्हीही त्याचा विचार केला असता अशी मांडणारी कविता प्रसिद्ध कवी दया पवार यांनी मांडली

'हे महाकवे
तुला महाकवी तरी कसे म्हणावे!
हा अन्याय,अत्याचार वेशीवर टांगणारा......
एक जरी श्लोक तू रचला असतास......
..तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते'

ही भाषा कविता वेदनेचा हुंकार घेऊन विद्रोहाची भाषा बोलू लागली कुठेतरी मनात या समाज रचनेचे स्तर, दुःख आणि शोषण पाहून तो कोंडवाडा असह्य होतोय ही जाणीव कविता मांडु लागली...

'शिळे खाली हात होता तरी नाही फोडला हंबरडा
किती जन्माची कैद कुणी निर्मिला हा कोंडवाडा'

या कोंडवाड्यातून विटाळ, चांडाळ, अस्पृश्य यातून आता आपली सुटका झालीच पाहिजे असा विचार दलित कविता घेऊन पुढे आली ती मानवता समाजात पसरविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारामुळेच जे. वि. पवार यांच्या नाकेबंदी या कवितासंग्रहातील कविता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची नोंद घेताना ते म्हणतात ...

'तुझ्या आवाजात आवाज मिळविणाऱ्या बेफाम लाटा
तुला झेलणाऱ्या, कुरवाळण्यार्या, आशाही लाटा आल्या: तुला गिळू गिळू म्हणणाऱ्या
पण तू तर त्यांनाच गिळलंस

तू झालास परिस्थितीवर स्वार आणि घडविलास नवा इतिहास..' या शब्दांमधून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनच कवीने उलगडून दाखवले आहे जगण्यासाठी केलेला संघर्ष ती जाणीवही ही कविता करून देते. आपले वेगळे अस्तित्व घेऊन दलित साहित्यात येते नामदेव ढसाळ यांची कविता मुडद्याला ही जागं

करणारी आहे .असेही मुडदेच होते पूर्वी माणसं स्वतःला माणूस म्हणून घेणारी त्यांच्यात खरा जीव ओतला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तीच प्रेरणा घेऊन नामदेव ढसाळ म्हणतात

'आता त्यांनी थांबायला हवं
आता त्यांनी बदलायला हवं दुसऱ्याच्या डोळ्यात कुसळ शोधण्यापेक्षा
स्वतःच्या डोळ्यातलं मुसळ दूर सरावं

ही जगण्यातील स्वतंत्रता शिकविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नामदेव ढसाळांच्या कवितेचा प्राण आहेत ...

'तू कधीच अनुभवली नाहीस खुडूक कोंबडी सारखी अंडी
महा चिंतक तुझा प्रवाह
परिवर्तन करून गेला आहे आमच्या जीवनात
सत्याला आता डावलून कसं चालेल?...'

ही उमेद जगण्याची नामदेव ढसाळांच्या कवितेतून येते आज आम्ही शिकलो, सावरलो ,जगलो आधीही जगतच होतो कुत्र्याप्रमाणे त्यांच्यात आणि आमच्यात काहीच फरक ठेवला नव्हता व्यवस्थेने त्या व्यवस्थेला मोडीत काढून प्रवाह बदलला आणि आज हे आयुष्य आम्ही जगतो आहोत सुखाची भाकरी खातोय ते केवळ तुमच्यामुळेच ...

'आज आमचे जे काही आहे
ते सर्व तुझेच आहे
हे जगणे आणि मरणे
हे शब्द आणि ही जीभ
हे सुख आणि दुःख
हे स्वप्न आणि वास्तव
ही भूक आणि तहान
सर्व पुण्याई तुझीच आहे'

याच विचाराने प्रेरित होऊन आता विद्रोह मनात पेटला आहे म्हणून ते म्हणतात

'प्रबोधन इतुके झाले की जीव थकून दमून गेला
रणांगण पुकारते आहे स्वीकारू चला त्या आव्हानाला '

आव्हान स्वीकारण्याची ताकत दिलेली आहे त्याला पुढे नेऊन हा विचार साहित्यात रुजविण्याचे काम अनेक दलित साहित्य कारानी केले दया पवार, नामदेव ढसाळ, नारायण सुर्वे ,यशवंत मनोहर, शरणकुमार लिंबाळे ,बाबुराव बागुल, लक्ष्मण पवार, वामन निंबाळकर, प्रज्ञा पवार, शंकरराव खरात, प्रेमानंद गज्वी,लक्ष्मण माने ,अण्णाभाऊ साठे, प्र. ई. सोनकांबळे ,रूस्तुम अचलखांब, लक्ष्मण गायकवाड,दत्ता भगत , नरेंद्र जाधव, रामनाथ चव्हाण, नामदेव कांबळे, एकनाथ आव्हाड तेआजचे नव्या उमेदीने दलित साहित्यात उतरणारे शिल्पा कांबळे, संजय पवार इत्यादी दलित साहित्यातील नावाजलेले लेखक आंबेडकरवादी प्रेरणा घेऊन त्या चळवळीचा ठसा मनावर उमटवून आपल्या साहित्याला बोलतं करतात. शब्दांना मोठ्या ताकदीनं समाजात पेरण्यासाठी दलित चळवळ, दलित साहित्यकार आत्मभान, स्व अस्तित्व आणि स्वतंत्र विचारसरणी यातील वास्तवता स्पष्टपणे आपल्या साहित्यातून पेरताना दिसतात दलित कविता जेवढ्या ताकदीनं त्याच ताकदीने कादंबरी ही मराठी साहित्यातील अनेक विषय साहित्यिकांच्या समोर ठेवताना दिसते कुचंबणा,चीड,पराक्रम,समूह प्रेम,असे अनेक पदर जगण्यातले उकलताना कांदबरी यशस्वी झाली आहे.दलित कथाही अनेक विषय घेऊन दलित जीवन गावकुसाबाहेरील जगणं, सामाजिक स्तराची,स्त्री-पुरुषाच्या संबंधातील सुक्ष्म संघर्षाचीही मांडणी करते. दलित कथा ही दलित साहित्यात सक्षमतेने आली आहे.

दलित साहित्य हे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतूनच निर्माण झाले गावकुसाबाहेरील माणसाला नीचेतेची वागणूक देणाऱ्या माणसाला धडा शिकविणारे पांडित्य खरे काय आहे ?माणसाची त्रि शुद्धि काय? हिंदुस्थानातील जातीभेदाची कारणे काय ?आर्थिक दुफळी याचे नेमके कारण काय? शिक्षणाचा अधिकार काय? राजकारण, समाजकारण, धर्मकारण, अर्थकारण आणि सगळ्यात मोठी व्यवस्था जातीव्यवस्था यावर कडाडून हल्ला करून दलित वर्गाला संघर्ष करण्याची गरज का आहे? याचेही स्पष्टीकरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले .जे जातीच्या बाहेर जाऊन समाजकारण करतात ते जातिभ्रष्ट आणि जे बिळातल्या उंदरां प्रमाणे जातीअंतर्गत असतात ते जातिनिष्ठ हे किती खरं ?यातील सत्यता पडताळून समाजाला सत्याचा मार्ग दाखवला आणि तेच दलित साहित्य करते. उष्टावळ, तुच्छता, कष्ट, हेळसांड, पारंपरिक कामच तू केलं पाहिजे या सगळ्या संकल्पना मोडून काढून नवसमाज उभारणी करण्यात दलित माणसात स्व'ची जाणीव निर्माण करण्यासाठी दलित साहित्य हे मोठ्या प्रमाणावर फायदेशीर ठरले त्यातून सर्वसामान्य आत समाजात क्रांती ती झाली. थोडक्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक, राजकीय, कायदा ,धर्मव्यवस्था, जातीव्यवस्था, पत्रकारिता, जलधोरण इत्यादी कार्याचा जेव्हा आढावा एक संशोधक अभ्यासक म्हणून आपण घेतो तेव्हाच या कायदेपंडिताचा एका मोठ्या चळवळीचा खंबीर नेतृत्व करणारा प्रेरणा देणारा प्रेरणास्त्रोत म्हणूनही अभ्यास करता येतो. ही सगळ्यात मोठी कामगिरी आहे ज्यामुळे एकाच पिढीला नव्हे तर अनेक पिढीला जगण्याचा खरा मार्ग शिकविला अशी प्रेरणा या साहित्यिकांच्या अंगी आहे. मूकनायक ,बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत, समता, जनता या वर्तमानपत्राच्या संपादकाची भुमिका जेव्हा बजावली तेव्हाच समाज प्रबोधनासाठी 'जात पात तोडक मंडळाची' ही उभारणी केली आणि त्या मोठ्या साहित्य कार्याची प्रेरणा घेऊन आज मराठी साहित्य मोठ्या प्रमाणात नावारूपाला व यांचा आवाका,व्याप्ती वाढली आहे. मोठ्याप्रमाणात विचारांची पेरणी आणि क्रांती साहित्यकांत झालेली आहे हा एक एक वेगळा पैलू डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनाचा जगण्याचा त्यांच्या विचाराने भारावलेला, प्रभावित झालेला प्रेरणा घेणारा आणि त्या मार्गावर जाणारा एक वाटाड्या म्हणून जी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतली एका मोठ्या जनसमूहाला ती जगणं शिकवून गेली स्व विचार, आत्मभान, स्वतंत्र विचारसरणी देऊन गेली अशा ज्वालामुखीला माझी मानाची वंदना...

## संदर्भ ग्रंथ


१. डॉ. श्रीपाल सबनीस , भारतीय प्रबोधन आणि नवं आंबेडकरवाद, मधुराज पब्लिकेशन पूणे.

२. शंकरराव खरात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा, इंद्रायणी साहित्य प्रकाशन पुणे.

३. नामदेव ढसाळ, तूझे बोट धरून चाललो आहे मी, लोकवाडमय गृह, मुंबई.

४. संपा. डॉ. उत्तम हनवते, अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अरुणा प्रकाशन, लातूर.

५. संपा. गणविर रत्नाकर, बहिष्कृत भारतातील अग्रलेख.